| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १२६ वा | शुक्रवार दिनांक २४ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹  RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानाला उमरगा येथे उत्स्फूर्त प्रतिसाद

### १५ हजार नागरिकांची उपस्थिती ; विविध शासकीय योजनांचा १८ हजार १९ लाभ, ३३० अर्जांचा स्वीकार





धाराशिव,ता.२३ जुलै (जिमाका) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघातील पहिले शिबिर बुधवारी २२ जुलै रोजी आदर्श महाविद्यालय,उमरगा येथे उत्साहात पार पडले.शिबिराला सुमारे १५ हजार नागरिकांनी उपस्थित राहून विविध शासकीय योजनाची माहिती घेऊन योजनांचा लाभ घेतला.

महसूल,आरोग्य,नगर परिषद, पंचायत समिती,महिला व बाल विकास,सामाजिक न्याय,कृषी, वन,पोलीस,परिवहन,टपाल, भूमिअभिलेख,निबंधक,रोजगार, तहसील आदी विभागांनी संयुक्तपणे नागरिकांना माहिती देऊन सेवा उपलब्ध करून दिल्या.

महसूल विभागामार्फत राज्यातील महिलांना शेतकरी दर्जाचे प्रमाणपत्र,गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद, मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना,शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे,तुकडेबंदी कायद्यांतर्गत स्थानिक क्षेत्र घोषणा,जिवंत सातबारा मोहीम, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना,घरकुल लाभार्थ्यांसाठी विशेष तरतूद, कुंभार समाजासाठी सवलती, शेतजमिनीच्या कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क माफी आदी योजनांची माहिती स्टॉलला भेट देणाऱ्यांना देण्यात आली.

यामध्ये मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेअंतर्गत १२,'जिवंत सातबारा' मोहिमेत १,३२४, घरकुल योजनेअंतर्गत १०,शेतजमिनीच्या कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क माफीचे १४ लाभ देण्यात आले. शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी ४८५ अर्ज प्राप्त झाले असून त्यावर नियमानुसार कार्यवाही सुरू आहे.

याशिवाय अ.क्र.१ ते ११ व्यतिरिक्त राज्य शासनाच्या विविध योजनांचा १७,५७७, केंद्र शासनाच्या योजनांचा २३०,स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांचा २१२ लाभ देण्यात आला.या विभागातून एकूण १९ हजार ३७९ लाभार्थ्यांना लाभ मिळाला.

नगर परिषद उमरगा,मुरूम व लोहारा यांच्या माध्यमातून रमाई आवास योजना,प्रधानमंत्री आवास योजना,डीआरडी प्रमाणपत्र, बांधकाम परवाने, झोन दाखले, नामांतर नोंदी आदी सेवांचा लाभ देण्यात आला.

आरोग्य विभागाने ८ हजार ८७१ सामान्य आरोग्य तपासण्या,३४७ बीपी व शुगर तपासण्या,१७३ महिला सामान्य तपासण्या,११० कुष्ठरोग तपासण्या,११० आयुष्मान भारत-महात्मा फुले जनआरोग्य योजना लाभ,५६ नवजात बालकांच्या हिप जॉइंट तपासण्या, ५४ शस्त्रक्रिया तपासण्या,३५ हृदयरोग,८५ अस्थिरोग आणि २१० कान-नाक-घसा तपासण्या केल्या.

सामाजिक न्याय विभागाने छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पूरस्काराचे ७ लाभ,तर वन विभागाने वन्यप्राण्यांमुळे झालेल्या नुकसानभरपाईबाबत मार्गदर्शन केले.२२ लाभार्थ्यांना वनमहोत्सवांतर्गत रोपे दिली तसेच विविध योजनांची माहिती दिली.

महिला व बाल विकास विभागाने लेक लाडकी योजनेसाठी १२ अर्ज, बालसंगोपन योजनेसाठी ९, प्रधानमंत्री मानवंदना योजनेसाठी ७ अर्ज भरले.तर सखी वन स्टॉप सेंटरसह विविध योजनांचे मार्गदर्शन केले.

कृषी विभागामार्फत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचे ११,भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे ५,कृषी यंत्रीकरण योजनेचे १२,श्री. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे ७ प्रत्यक्ष लाभ देण्यात आले. तसेच पीककर्ज,सलोखा योजना, वाटणीपत्र,मुद्रांक शुल्क माफी आदी योजनांसाठी अर्ज स्वीकारण्यात आले.

परिवहन विभागाने वाहतूक नियम, ड्रंक अँड ड्राइव्ह,वाहन परवाना, एनसीसीआर पोर्टल व ऑनलाइन सुविधांबाबत जनजागृती केली. पोलीस विभागाने सायबर गुन्हे, व्हॉट्सप-इन्स्टाग्राम हॅकिंग, ओटीपी फसवणूक याबाबत मार्गदर्शन केले.

पंचायत समितीमार्फत संगांयो योजनेचे ४२९ मंजुरी आदेश,१२६ शिधापत्रिका, ४८२ डिजिटल ७/१२,९३ ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी,आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबास मदत,फेरफार निकाली काढणे आदी सेवा देण्यात आल्या.

तहसील कार्यालय, उमरगा यांनी ४,७२४ विविध दाखले,१३५ संगांयो योजना मंजुरी आदेश,२५ शिधापत्रिका,४९ डिजिटल ७/१२, १९ ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी,तर तहसील कार्यालय,लोहारा यांनी १,३५० विविध प्रमाणपत्रे व दाखले वितरित केले.

शिबिरामध्ये विविध विभागांच्या माध्यमातून नागरिकांना प्रत्यक्ष लाभ देतानाच नव्या योजनांची माहिती,अर्ज स्वीकारणे,मार्गदर्शन आणि तातडीच्या सेवाही उपलब्ध करून देण्यात आल्या. एकूण १८ हजार १९ नागरिकांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला,तर ३३० नागरिकांचे अर्ज स्वीकारण्यात आले.

## क्राईम न्युज

### धाराशिवतून मोटारसायकलची चोरी : गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणअंतर्गत फिर्यादी नामे-रमाकांत गोपाळराव कुर्ले, वय ६३ वर्षे, रा. बेंबळी रोड शिवपार्वतीनगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ८०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.२०.०७.२०२६ रोजी बेंबळी रोड शिवापार्वतीनगर धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- रमाकांत कुर्ले यांनी दि.२२.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सत्तर हजाराची ॲल्युमिनीयम तारेची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२९.०६.२०२६ रोजी बरमगाव शिवार येथे सिरेन्टीका कंपनीचे ३३ केव्ही उपवाहीनीची सहा पोलवरील एक किलोमिटर ॲल्युमिनीयम तार अंदाजे ७०,००० किंमतीचा मुद्देमाल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-खंडेराव दगडू भतलवंडे, वय ३५ वर्षे, व्यवसाय सुपरवायझर(गौल्ब मॅनेजमेंट न्ड लेबर सप्लाय प्रा. लि. धाराशिव) रा. काजळा ता. जि. धाराशिव यांनी दि.२२.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२),३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रक मधील डिझेलची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रथमेश दत्तात्रय कोळेकर, वय २२ वर्षे, रा. नारायण चिंचोळी ता. पंढपुर जि. सोलापूर हे दि. २२.०७.२०२६ रोजी बालाजी आमाईन्स तामलवाडी समोर ट्रक क्र एमएच २५ एजे५२०६ उभी करुनगाडीचे कॅबिनमध्ये झोपले असता अज्ञात स्विफट कारचा चोरटा व्यक्तीने ट्रकच्या डिझेल टाकीचे कुलूप तोडून टाकीतील २१० लिटर डिझेल एकुण २०,५८० किंमतीचे डिझेल स्विफट कारमध्ये घालुन चोरुन घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- प्रथमेश कोळेकर यांनी दि.२२.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

तुळजापूर(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अदित्य अजय राखेलकर, वय २८ वर्षे, रा. मंगळवारपेठ तुळजापर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची हिरो स्प्लेंडर प्लस मोटरसायकल ही दि.१६.०७.२०२६ रोजी फिर्यादीचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अदित्य राखेलकर यांनी दि.२१.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पंढरीच्या वाटेवर 'एसटीवारी' ; धाराशिवमधून १७० बस धावणार

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- आषाढी वारीला अवघा एक दिवस शिल्लक राहिल्याने वारकऱ्यांना विठुरायाच्या दर्शनाची आस लागली आहे. त्यामुळे अनेक दिंड्यांसह वारकऱ्यांची पावले पंढरपूरकडे वळू लागली आहेत. वारकऱ्यांना विठ्ठल दर्शनासाठी जाण्यासाठी धाराशिव बसस्थानकासह जिल्ह्यातील सर्वच बसस्थानकांवर गर्दी होत आहे. धाराशिव एसटी विभागातून दि. २० जुलै रोजी सप्तमीच्या दिवशी ७ एसटी बसेस, तर दि. २१ जुलै रोजी अष्टमीच्या दिवशी १२ बसेस अशा एकूण १९ बसच्या ६३ फेऱ्या पंढरपूरसाठी झाल्या आहेत.

वारीसाठी ४२ एसटी प्रवाशांनी एकत्रितपणे एकाच गावातून एसटीचे तिकीट बुकिंग केल्यास थेट त्या गावातूनच वारकऱ्यांना पंढरपूरला जाण्यासाठी एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. दि. २० जुलैपासून जिल्ह्यातील धाराशिव बसस्थानकासह अन्य बसस्थानकांतून दररोज एसटी बसेस पंढरपूरच्या दिशेने धावत आहेत. आत्तापर्यंत १९ बसच्या ६३ फेऱ्यांमधून ४ हजार ५०० किलोमीटरचे अंतर पार झाले आहे. त्यामुळे धाराशिव विभागाला सप्तमी व अष्टमीच्या दोन दिवसांत रोख १ लाख ४४ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तर सवलतीसह एकूण २ लाख ८० हजार ८४७ रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

धाराशिव एसटी महामंडळातर्फे यंदाच्या आषाढी वारीसाठी वारकऱ्यांच्या सोयीसाठी एकूण १७० एसटी बसेसचे विशेष नियोजन करण्यात आले आहे. या बसेस आषाढी वारीच्या दिवशी तसेच दुसऱ्या दिवशी द्वादशीला धावणार आहेत. दरवर्षी आषाढी वारीसाठी राज्यभरातून लाखो भाविक पंढरपूर येथे दाखल होतात. तसेच धाराशिव जिल्ह्यातूनही मोठ्या प्रमाणात वारकरी पंढरपूरला जातात. यंदा होणारी गर्दी लक्षात घेऊन धाराशिव एसटी महामंडळाने आगाऊ १७० बसेसचे नियोजन केले आहे. प्रवाशांची गर्दी वाढल्यास एसटी बसेसची संख्या वाढवण्यात येईल, असे धाराशिवचे विभाग नियंत्रक अजय पाटील यांनी सांगितले.

## कारची मोटारसायकला धडक, एकाचा मृत्यू तर दुसरा जखमी

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-सलमान जिलानी शेख, वय २२ वर्षे, व सोबत अजरोद्दीन जिलानी शेख वय २३ वर्षे, दोघे रा. आष्टा कासार ता. लोहारा जि. धाराशिव हे दोघे दि.१३.०७.२०२६ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान आष्टामोड ते आष्टाकासार जाणारे रोडवर कोळनुर पांढरी शिवार येथे कार चा चालक जानेमिया रा. जळकोट ता. तुळजापूर जि. धाराशिव यानी त्याचे ताब्यातील कार ही हायगईने व निष्काळजीपणे चालवून सलमान शेख यांचे मोटरसायकलला समोरुन धडक दिली. या अपघातात अजरोद्दीन शेख हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर सलमान शेख हे किरकोळ जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सलमान शेख यांनी दि.२२.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५ (अ)(ब) सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव येथे केंद्रीय विद्यालय सुरू करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा परिषद अध्यक्ष आदरणीय अर्चनाताई पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे धाराशिव येथे केंद्रीय विद्यालय सुरू करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. या अनुषंगाने केंद्रीय विद्यालयाच्या प्रस्तावित जागेची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकातील सदस्यांचे धाराशिव नगर परिषदेच्या नगराध्यक्षा मा. सौ. नेहा ताई राहुल काकडे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी केंद्रीय विद्यालयाच्या स्थापनेसाठी आवश्यक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. धाराशिव शहरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, या दृष्टीने केंद्रीय विद्यालय लवकरात लवकर सुरू व्हावे, यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका नगर परिषदेकडून व्यक्त करण्यात आली. केंद्रीय विद्यालयाचे सहाय्यक आयुक्त श्री ए.सी. पाटील, मानखुर्द केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य श्री पवन खंडाल, सोलापूर केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य श्री उमाकांत जोशी यांनी प्रस्तावित जागेबाबत समाधान व्यक्त करून मा आ राणाजगजितसिंह पाटील साहेब यांनी सांगितल्या प्रमाणे याच सत्रात केंद्रीय विद्यालय सुरु करण्यासाठी सकारात्मकता दर्शविली

याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. धाराशिवच्या शैक्षणिक विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक पाऊल ठरणार आहे.

## इंडिया स्किल स्पर्धा २०२६-२७ मध्ये सहभागी होण्याची सुवर्णसंधी २३ वर्षांखालील तरुणांना कौशल्य सादर करण्याची संधी ;पात्र उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणीचे आवाहन

धाराशिव दि.२३ जुलै (जिमाका) जगातील सर्वात मोठ्या कौशल्य स्पर्धांपैकी एक असलेल्या 'इंडिया स्किल कॉम्पिटिशन २०२६-२७' मध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील तरुणांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारी ही स्पर्धा ऑलिम्पिकच्या धर्तीवरील प्रतिष्ठित स्पर्धा मानली जाते.

जगभरातील २३ वर्षांखालील तरुणांना आपल्या कौशल्याचे सादरीकरण करण्याची संधी या स्पर्धेत मिळणार असून,भारत सरकारच्या नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने २०२६ मध्ये ६३ क्षेत्रांशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,सेक्टर स्किल कौन्सिल तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने या स्पर्धा पार पडणार आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाइन नोंदणी करावी.जिल्हा, विभाग,राज्य आणि देशपातळीवरील स्पर्धांमधून निवड झालेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत.

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी वयोमर्यादा हा एकमेव निकष असून,सर्वसाधारण स्पर्धांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.तर Digital Construction, Cloud Computing, -dditive Manufacturing, Cyber Security, ICT Network Infrastructure, Industrial Design Technology, Industry 4.0, Information Network Cabling, Mechatronics, Optoelectronic Technology, Robot System Integration, Water Technology, Dental Prosthetics आणि -ircraft Maintenance या क्षेत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.

जिल्हा,विभाग,राज्य आणि देशपातळीवरून प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांची निवड करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेत सर्व आयटीआय (ITI),पॉलिटेक्निक, MSME Tool Rooms, CIPETS, IIT,अभियांत्रिकी महाविद्यालये,महाराष्ट्र स्टेट स्किल युनिव्हर्सिटी,MSBVET, खासगी कौशल्य विद्यापीठे,ललित कला महाविद्यालये, Flower Training Institute,Institute of Jewelry Making,विविध प्रशिक्षण संस्था,कौशल्य संस्था आणि व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन सहायक आयुक्त,कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव यांनी केले आहे.

# दलित मित्र मोतीराम चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्याचे वाटप



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथील दलित मित्र मोतीराम चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यांचे कार्य समाजासाठी कौतुकास्पद आहे.त्यांनी तळागाळातील लोकांसाठी कार्य केले असे मत माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील आलियाबाद येथे दलित मित्र मोतीराम चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते.संस्थेच्या माध्यमातून त्यांनी गोरं गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे पवित्र कार्य केले असे म्हणाले. या कार्यक्रमास यावेळी व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोक पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य गणेश सोनटक्के, माजी नायब तहसीलदार माणिकराव चव्हाण, माजी सभापती प्रकाश चव्हाण,प.स.सदस्य अशिष सोनटक्के ,जळकोटचे सरपंच गजेंद्र कदम,आलियाबाद सरपंच सुर्यकांत चव्हाण, रामतीर्थ सरपंच लक्ष्मण राठोड, महेश कदम,कृष्णात मोरे, तंटामुक्ती अध्यक्ष यशवंत पाटील, अरूण लोखंडे, अनिल छत्रे,उपसरपंच अमृता चव्हाण,बबन मोरे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले..

कार्यक्रमास सेवानिवृत्त गटविकास अधिकारी टी.एन.चव्हाण, दिलीप सोमवंशी,शंकर चव्हाण,डी.डी.कदम, विजय मोरे, पंडित कदम, सुनील माने, संजय माने, संजय अंगुले, माजी चेअरमन राजु पाटील, बसवराज कवठे,नेमिनाथ चव्हाण, अमोल चव्हाण,सुभाष नाईक,वाय.के.चव्हाण,ग्रा.प.सदस्य सुर्यकांत राठोड,विनायक चव्हाण, शिवाजी पोलीस पाटील, माणिक राठोड, सिद्राम पवार, यशवंत राठोड,थावरू राठोड, गणेश चव्हाण, देविदास चव्हाण,महादेव राठोड, बाबुराव चव्हाण, व्यंकट राठोड, हरिष जाधव,रामू चव्हाण ग्रामसेवक अविनाश खुंटेगावे यांच्या सह संस्थेच्या शाळेतील प्राचार्य संतोष चव्हाण, मुख्याध्यापक विनायक राठोड, ए.जी.पवार, शिवाजी कवठे यांच्या सह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH MOHAMMAD ABDULHAMID TO MOHAMMAD ABDUL HAMID SHAIKH.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the MOHAMMAD ABDUL HAMID SHAIKH will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- SHAIKH MOHAMMAD ABDULHAMID.
NEW NAME:- MOHAMMAD ABDUL HAMID SHAIKH .
Address :- 461,INFRONT OF DNYANESHWAR MANDIR,MILLI COLONY, OSMANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 384673532072
Mob. No.-9730303861


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : QUAZI PAEVEEN BEGUM M IQBAL SAHIB TO KHATIB ANJUM ZAHEER.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the KHATIB ANJUM ZAHEER will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- QUAZI PARVEEN BEGUM M IQBAL SAHIB.
NEW NAME:- KHATIB ANJUM ZAHEER .
Address :- 219, IDGHA ROAD,OPP.HOME GUARD OFFICE, KHWAJA NAGAR, OSMANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 873831367472
Mob. No.-9970471307

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH MOHSIN KAREEM TO MOHSIN KAREEM KHAN.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the MOHSIN KAREEM KHAN will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- SHAIKH MOHSIN KAREEM.
NEW NAME:- MOHSIN KAREEM KHAN .
Address :- 2161, ISLAMPURA,NEAR MOHAMADIYA MASJID, DIKSAL.TA. KALLAM. DIST. OSMANABAD -413507
AADHAR NO.- 734366415934
Mob. No.-9422650976


# दिल्लीतील आंदोलना दरम्यान विद्यार्थ्यांवर अश्रुधूर, लाठीचार्ज



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- देशभर गाजत असलेल्या विद्यार्थी आंदोलनाने आता आंतरराष्ट्रीय पातळीवरही मोठे लक्ष वेधून घेतले आहे. विविध जागतिक प्रसारमाध्यमांनी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत लोकशाही मूल्ये, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांबाबत गंभीर चिंता व्यक्त केल्याचे वृत्त समोर आले आहे. दिल्लीतील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर अश्रुधूर, लाठीचार्ज आणि बळाचा वापर झाल्याचे आरोप होत असून, अनेक आंदोलक जखमी झाल्याची माहिती विविध माध्यमांतून समोर आली आहे. या घटनेमुळे देशातील राजकीय वातावरण आणखी तापले असून, विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत असून, संवादाऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात आहे. दुसरीकडे, प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्यात आल्याचा दावा केला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**
**9284321472**


# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून अनेक योजनांचा लाभ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष गावात देण्यात आला आहे.-आमदार श्री.स्वामी

**※ उमरगा येथे महाराजस्व समाधान शिबिर अभियान**
**※ विविध योजनेच्या लाभार्थ्यांना लाभाचे वाटप**
**※ अनेक विभागांचे माहिती स्टॉल**
**※ महाआरोग्य शिबिराचा अनेकांनी घेतला लाभ**

धाराशिव दि.२२ जुलै (जिमाका) शासनाच्या अनेक योजना आहेत. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाच्या माध्यमातून प्रशासन गतिमान आली लोकाभिमुख करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे.या अभियानाच्या माध्यमातून प्रशासन समाजातील प्रत्येक घटकाला लाभ देण्याचे काम करत आहे.असे प्रतिपादन आमदार बसवराज पाटील यांनी केले.

२२ जुलै रोजी उमरगा येथील आदर्श महाविद्यालयाच्या प्रांगणात उमरगा- लोहारा विधानसभा मतदारसंघस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान व महाआरोग्य शिबिराचे उपघाटन आमदार श्री.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन तथा मुरुम नगरपालिकेचे अध्यक्ष बापुराव पाटील,शरद पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष तथा महाआरोग्य शिबिराचे संयोजक श्री.शरण पाटील,उमरगा उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे,लोहारा उपविभागीय अधिकारी सागर नन्नवरे,उमरगा तहसीलदार गोविंद येरमे,लोहारा तहसीलदार रणजीतसिंह कोळेकर,तसेच जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य व नगर पालिका सदस्यांची मंचावर प्रामुख्याने उपस्थिती होती.

आमदार श्री.पाटील म्हणाले की, राज्याने विविध क्षेत्रात आघाडी घेतली आहे.शेती हा राज्याचा मुख्य व्यवसाय आहे. महसूलमंत्र्यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन शेत रस्त्यांसाठी शेतकरी बळीराजा पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे.या योजनेची सुरुवात राज्यात उमरगा तालुक्यापासून झाली.राज्यात ही योजना आता सर्वत्र प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.या योजनेमुळे शेतमाल शेतातून थेट बाजारपेठेत पोहोचत आहे. आरोग्य व शेतरस्त्याच्या बाबतीत उमरगा तालुक्यात चळवळ सुरू केली आहे.शेतकरी हितासाठी ही चळवळ सुरू आहे. जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी प्रशासन गतिमान करण्यासाठी पुढाकार घेऊन मोठ्या प्रमाणात योजनांच्या अंमलबजावणीला गती दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यातून उमरगा तालुका पुढे येत असल्याचे सांगून आमदार श्री.पाटील पुढे म्हणाले की,१०० खाटांचे महिला रुग्णालय उमरगा येथे झाले पाहिजे ही मागणी आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी आपण पुढाकार घेणार आहोत. शेतरस्त्यांच्या तसेच दोन्ही तालुक्यांतील रस्त्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.त्यासाठी नीतीची तरतूद करण्यात येईल. शासनाच्या विविध योजना नागरिक व लाभार्थ्यांपर्यंत आणखी प्रभावीपणे पोहोचविण्यात येतील यापुढे तालुक्याची सेवा सर्वांना सोबत घेऊन करणार असल्याचे श्री.पाटील यावेळी म्हणाले.

आमदार श्री.स्वामी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून अनेक योजनांचा लाभ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष गावात देण्यात आला आहे.३७ भूकंपग्रस्त गावांच्या नूतनीकरण व मूलभूत सुविधेसाठी निधी उपलब्ध झाला पाहिजे.निम्न तेरणा प्रकल्पाच्या कालव्यांच्या नूतनीकरणाची गरज आहे.या भागात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून हा भाग समृद्ध झाला पाहिजे.उमरगा येथे १०० खाटांच्या महिला रुग्णालयाची आवश्यकता आहे.त्यामुळे शेजारच्या कर्नाटक राज्यातील सीमावर्ती भागातील रुग्णांना देखील या रुग्णालयाचा लाभ होणार असल्यामुळे या रुग्णालय उभारणीला शासनाने मान्यता देऊन निधी उपलब्ध करून द्यावा. अतिक्रमणे नियमाकुल करणे व पाणंद रस्त्याची कामे वेळेत झाली पाहिजे.येथे आयोजित महाआरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा.असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी श्री.पुजार म्हणाले की,या शिबिराच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे.शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी प्रशासनाकडून करण्यात येत आहे. महसूल विभागात क्रांतिकारी निर्णय घेण्यात आले आहे. औद्योगिक व घरांसाठी आता अकृषक परवानगीची गरज नाही. निवासी अतिक्रमणे नियमाकुल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. लक्ष्मीमुक्ती योजनेत सातबारावर आता पतीसोबत पत्नीचे नाव घेण्यात येणार आहे.अॅग्रीस्टॅकची नोंदणी करण्यात जिल्हा पुढे आहे. स्वामीत्व सनद,मुख्यमंत्री बळीराजा शेतपानंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.या योजनेमुळे शेतकऱ्यांना बारमाही रस्ते मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.योजनेतील घरकुलाला वाळू उपलब्ध करून देण्यात येत आहे.यंत्रणा लाभ देण्यासाठी सज्ज असून नागरिकांनी योजनांचा लाभ घ्यावा.असे आवाहनही श्री.पुजार यांनी यावेळी केले.

या शिबिरात भूमी अभिलेख विभाग,महसूल विभाग,मुख्यमंत्री सहायता कक्ष,नाक कान घसा तपासणी,अस्थिरोग तपासणी, हृदयरोग,शल्य चिकित्सा,नेत्र विभाग,महसूल विभागाचा संजय गांधी निराधार योजना,पुरवठा विभाग,आधार प्रमाणीकरण, एस.टी.महामंडळ,पोलीस विभागाचा सायबर सेल व महिलासुरक्षा माहिती,सरकारी कामगार अधिकारी,पोस्ट विभाग,कृषी विभाग,समाज कल्याण विभाग, नगरपरिषद,पशुसंवर्धन,पंचायत विभाग,हरित धाराशिव सामाजिक वनीकरण विभाग,मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व औषध वितरण कक्ष असे विविध स्टॉल लावण्यात आले.विविध स्टॉलला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेटी देऊन योजनांची माहिती जाणून घेऊन संबंधित विभागांची माहिती पत्रके घेतली.




यावेळी मंचावरून मान्यवरांच्या हस्ते विविध योजनेच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रे, धनादेश तसेच आवश्यक दस्तावेज वाटप करण्यात आले.प्रास्ताविक उमरगा उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांनी केले.उपस्थितांचे आभार तहसीलदार गोविंद येरमे यांनी मानले.

नागरिकांनी महाआरोग्य शिबिरातून आपली आरोग्य तपासणी मोठ्या संख्येने करून घेतली.या महासमाधान शिबिराला उमरगा व लोहारा तालुक्यातील नागरिक व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649